# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्लॉट नं. जी-९, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

वेबसाईट : www.mahadiscom.in.

## <u>जाहिर सुचना</u>

शहरी धोरण / सेझ धोरण/ औद्योगिक धोरण/ माहिती तंत्रज्ञान धोरण इत्यादी करीता क्षेत्र विकसित करण्यासाठी वितरण फ्रेंचाईसी आणि ठोक वितरण दर (बी.एस.टी.) साठी निवड करण्याकरिता महावितरण कंपनीव्दारा तडजोड निवेदनांच्या माध्यमातून दाखल केलेल्या याचिकेवर सुचना / अभिप्राय मागविण्याबाबत.

## <u>प्रकरण क्र. ६२ / २००९.</u>

विद्युत कायदा २००३ च्या कलम १४ (७), ८६ (१) (ब), ९४ (२) आणि मा. वीज नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ च्या विनियम ८५ च्या अन्वये म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित (महावितरण) ने दिनांक २५.०९.२००९ रोजी शहरी धोरण / सेझ धोरण/ औद्योगिक धोरण/ माहिती तंत्रज्ञान धोरण इत्यादी करीता क्षेत्र विकसित करण्यासाठी वितरण फ्रेंचाईसीसाठी निवड करण्याकरिता महावितरण कंपनीव्दारा तडजोड निवेदनांच्या माध्यमातून यांचिका दाखल केलेली आहे.

महावितरण कंपनीची प्रार्थना (मागणी) खालील प्रमाणे आहे.

१) याचिका कर्त्याच्या प्रस्तावाची तपासणी अनुकूल निर्णयाच्या दृष्टीकोनातून करावी.

२) शहरी धोरण / सेझ धोरण/ औद्योगिक धोरण/ माहिती तंत्रज्ञान धोरण / अन्य विकास योजना इत्यादी बाबतीत क्षेत्राचा विकास करण्याकरीता वितरण फ्रेंचाइसी नेमणूकीकरीता तडजोड निवेदनांच्या माध्यमातून मान्यता मिळावी.

३) मिश्रभार तसेच औद्योगिक भारासाठी जिथे केंद्रीय / राज्य शासनाचे धोरण लागू आहे. एका ठिकाणी विद्युत पुरवठा करणा-या वितरण फ्रेंचाइसीसाठी ठोक वितरण दर लागू करुन निर्धारीत करण्याच्या पध्दतीला सहमती, मान्यता किंवा सुधारणा करण्याबाबत.

४) फ्रेंचाईसींना लावायचे ठोक वितरण दर (बी.एस.टी.) करीता मा. आयोगाचे अंतिम आदेश निर्गमित होईपर्यंत अंतरीम उपाय म्हणून महावितरण कंपनीने निर्धारीत केलेल्या ठोक वितरण दरास मान्यता मिळावी.

५) वितरण फ्रेंचाइसीचे कार्य करण्याकरीता कुठल्याही व्यावसायिक अटी व शर्ती निर्धारीत करणे.

६) महावितरण आणि वितरण फ्रेंचाइसीव्दारा वितरण फ्रेचाइसी करारनाम्याला अंतिम रुप देण्याकरिता निर्देश प्रदान करणे.

७) ही याचिका दाखल केल्यानंतर आणि पुढील भविष्यातील तारखेमधील आवश्यक सादरीकरणाकरीता अनावधानाने सुटलेल्या बाबी / चुक / कमतरता या करीता माफी आणि अंतर्भाव / बदल / सुधारणा याकरीता मान्यता देणे.

८) या प्रकरणातील सत्यता आणि परिस्थिती लंक्षात घेता माननिय आयोगाला योग्य वाटेल ते आणि अशाप्रकारच्या क्षेत्रांचा विकास योग्य पध्दतीने सुनिश्चित करण्याकरीता यापुढील आणि इतर आदेश निर्गमित करणे.

२. मा आयोगाने सदर याचिका पुढील सुनावणीकरिता दाखल करुन घेतलेली आहे आणि महावितरण कंपनीस आदेश दिलेले आहेत की, या जाहिर सुचनेव्दारे वरील याचिकेवर जनतेकडून सुचना / अभिप्राय मागविण्यात यावेत.

३. सविस्तर याचिकेच्या दस्तावेजाच्या प्रती (चर्चा पत्रासोबत) ७५/- रुपयांचा भरणा रोखीने किंवा "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित " या नावाने डी.डी./ धनादेशाने केल्यास महावितरण कंपनीच्या खाली दिलेल्या कार्यालयातून प्राप्त करता येतील.

**मुख्य कार्यालय :-**

१) अधीक्षक अभियंता (विनिक),
महाराष्ट्र राज्य विज विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
५ वा मजला, प्रकाशगड, प्लॉट नं. जी -९,
बांद्रा (पूर्व), मुंबई -४०० ०५१.
एस.टी.डी. कोड :- ०२२, दुरध्वनी क्रं. २६४७६८४३ (वै), २६४७४२११ (का)
ई-मेल :- setrc@mahadiscom.in

२) अधीक्षक अभियंता (वाणिज्य-२),
महाराष्ट्र राज्य विज विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
५ वा मजला, प्रकाशगड, प्लॉट नं. जी -९,
बांद्रा (पूर्व), मुंबई -४०० ०५१.
एस.टी.डी. कोड :- ०२२, दुरध्वनी क्रं. २६४७४२११ (का)
ई-मेल :- cecomm@mahadiscom.in

४. मा. आयोगाने महावितरण कंपनीस जनतेकडून वरील याचिकेवर सुचना व हरकती मार्गविण्याचा आदेश दिलेला आहे. अधीक्षक अभियंता (विनिक) यांना पाठविलेल्या सुचना आणि हरकती सचिव, महाराष्ट्र विज नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर नं.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५. (फॅक्सः २२१६३९७६ ई-मेल : mercindia@mercindia.org.in) यांच्या कार्यालयात सोमवार दिनांक २९.०३.२०१० पर्यंत पाठविता येतील.

५.	प्रत्येक जण ज्याला सुचना व हरकती नोंदविण्याची इच्छा असेल त्याने आपले संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पत्ता आणि ई-मेल पत्ता (असल्यास) सहा प्रतींमध्ये इंग्रजी किंवा मराठीत सादर करावे. हरकती आणि सुचना एखादया संस्था किंवा ग्राहकाच्या समुहातर्फे दाखल केलेल्या असल्यास तसे स्पष्टपणे नमुद करावे. तसेच सुचना पाठविण्या-याची वैयक्तिकरित्या बाजु मांडण्याची इच्छा असेल तर तसे त्याने स्पष्टपणे नमूद करावे, अशा बाबतीत मा. आयोगाकडून दिनांक ६ एप्रिल २०१० रोजी ११.०० वाजता सेंट्रम हॉल, पहिला मजला, सेंटर नं.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४०० ००५ येथे होणा-या जाहिर सुनावणीच्यावेळी संधी देण्यात येईल. त्यासाठी वेगळी सुचना देण्यात येणार नाही.

६.	सोमवार दिनांक २९ मार्च २०१० पर्यंत प्राप्त झालेल्या सर्वसुचना व हरकतीना ३ दिवसांच्या आत परंतु गुरुवार दिनांक ०१ एप्रिल २०१० च्या अगोदर प्रत्येक सुचना व हरकतींना महावितरणने उत्तर द्यावयास पाहिजे. हितधारकांनी या महावितरण कंपनीने दिलेल्या उत्तरावर त्यांचे प्रत्युत्तर जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा शुक्रवार दिनांक ०२ एप्रिल २०१० पूर्वी सादर करावी.

७.	विस्तृत याचिका दस्तावेज (चर्चेच्या कागदपत्रासह) महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर आणि तसेच मा. विज नियामक आयोगाच्या संकेत स्थळावर (www.mercindia.org.in) डाऊन लोडेबल स्वरुपात (निःशुल्क) उपलब्ध आहे.

तारीख : ५ मार्च २०१०	**संचालक (संचालन)**

मुंबई	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

**टिप** :- सदर जाहिर सुचना इंग्रजी सुचनेवरुन भाषांतरीत केलेले आहे. वरील मराठी सुचनेत त्रुटी आढळल्यास इंग्रजी आवृत्ती वाचावी.